३२८

## MAHARASHTRA ACT No. XLVIII OF 1977

### THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS AND MUNICIPAL CORPORATIONS (POSTPONEMENT OF ELECTIONS DUE TO ENSUING GENERAL ELECTIONS TO THE STATE LEGISLATIVE ASSEMBLY) ACT, 1977.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ३ नोव्हेंबर १९७७ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,
अपर सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLVIII OF 1977

### AN ACT TO PROVIDE FOR FURTHER POSTPONEMENT OF ELECTIONS TO CERTAIN MUNICIPAL COUNCILS AND MUNICIPAL CORPORATIONS FOR A SHORT PERIOD ON ACCOUNT OF ENSUING GENERAL ELECTIONS TO THE STATE LEGISLATIVE ASSEMBLY.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात" दिनांक ३ नोव्हेंबर १९७७ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

## सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८.

### राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित नगरपालिका व महानगरपालिका यांच्या निवडणुका अल्प मुदतीकरिता आणखी लांबणीवर टाकण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम.

सन १९७५ चा महा राष्ट्र अधि- नियम क्रमांक ५१.

ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपालिका व महानगरपालिका (आणीबाणीच्या मुदतीत निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबत) अधिनियम, १९७५ अन्वये विवक्षित नगरपालिका व महानगरपालिका यांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्यात आल्या होत्या, परंतु, आणीबाणी काढून टाकण्यात आलेली असल्याने, तो अधिनियम २१ सप्टेंबर १९७७ रोजी अंमलात असण्याचे बंद झालेले आहे ;

आणि ज्याअर्थी, ज्या अधिनियमान्वये ज्यांची मुदत वाढविण्यात आली होती अशा विद्यमान नगरपालिका व महानगरपालिका यांच्या जागी नवीन नगरपालिका व महानगरपालिका यांची रचना करण्यासाठी निवडणुका घेणे आवश्यक होते ;

आणि ज्याअर्थी, नगरपालिकांच्या व महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी ठेवलेल्या मतदारांच्या याद्यांसाठी किंवा निर्वाचक सूच्यांसाठी, महाराष्ट्र विधानसभेची मतदारांची यादी ही आधारभूत आहे आणि विधानसभेच्या मतदारांच्या यादीत सुधारणा करणे चालू आहे ; तसेच त्यामध्ये ज्यांचे वय १ जानेवारी १९७७ रोजी २१ वर्षे पूर्ण झालेले आहे अशा मतदारांची किंवा निर्वाचकांची नावे समाविष्ट करण्याचे चालू असून हे सुधारणा करण्याचे काम ऑक्टोबर १९७७ अखेरपर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे ;

आणि ज्याअर्थी, विधानसभेच्या मतदारांची सुधारित यादी उपलब्ध झाल्यानंतरच, नगरपालिकांच्या व महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी, मतदारांच्या अद्ययावत् याद्या किंवा निर्वाचक सूच्या आणि प्रभाग (वॉर्ड्‌स) किंवा मतदारसंघ, इत्यादी अंतिमतः निश्चित करणे शक्य होईल ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांची पूर्वतयारी करण्यात जिल्हाधिकारी आणि इतर अधिकारी गुंतलेले असतील ;

आणि ज्याअर्थी, नगरपालिका व महानगरपालिका यांच्या सार्वत्रिक निवडणुका या, विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांबरोबरच किंवा त्यानंतर लगेच घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकाऱ्यांना व इतर शासकीय व नगरपालिका अधिकाऱ्यांना, त्यांचे इतर काम विस्कळित होऊ न देता, आवश्यक तो कर्मचारीवर्ग देऊ करण्यासाठी आणि त्यांना निरनिराळ्या ठिकाणी पाठविण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे आणि एका पाठोपाठ होणाऱ्या या दुसऱ्या निवडणुकांसाठी इतर उपाययोजना करणे आणि संबंधित उमेदवारांची व मतदारांची किंवा निर्वाचकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची खात्री करून घेणे शक्य व्हावे अशा रीतीने या निवडणुकांचा कार्यक्रम आखावा लागणार आहे ;

आणि ज्याअर्थी, वर नमूद केलेल्या कारणांसाठी, या निवडणुका ३१ मे १९७८ हा दिवस धरून, त्या दिवसापर्यंतच्या अल्प मुदतीपर्यंत आणखी लांबणीवर टाकण्यासाठी आणि परिणामी संबंधित नगरपालिकांचे व महानगरपालिकांचे (अध्यक्ष धरून) विद्यमान पालिका सदस्य व प्रशासक यांचा पदावधी आणखी वाढविण्यासाठी आणि इतर संबंधित गोष्टींसाठी तरतूद करणे आवश्यक आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अठ्ठाविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, प्रारंभ व कालावधी.

१. (१) या अधिनियमास महाराष्ट्र नगरपालिका व महानगरपालिका (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीमुळे निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७७ असे म्हणता येईल.

(२) तो २० सप्टेंबर १९७७ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(३) तो, ३१ मे १९७८ हा दिवस धरून तोपर्यंत किंवा राज्य शासन शासकीय राजपत्रात अधिसूचित करील अशा त्यापूर्वीच्या तारखेपर्यंत अंमलात राहील व त्यानंतर समाप्त होईल. मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ हे, हा अधिनियम समाप्त झाल्यानंतर, जणू तो महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित झाला असल्याप्रमाणे लागू होईल. १९०४ चा मुंबई अधिनियम १.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "प्रशासक" म्हणजे, जी नगरपालिका किंवा महानगरपालिका निष्प्रभावित किंवा विसर्जित केली आहे किंवा जी स्थापन करण्यात किंवा पुनर्स्थापित करण्यात आलेली नाही किंवा अन्य प्रकारे अस्तित्वात असण्याचे बंद झाले आहे, अशा कोणत्याही नगरपालिकेच्या किंवा महानगरपालिकेच्या शक्तींचा वापर करण्यासाठी किंवा तिच्या कर्तव्यांचे पालन करण्यासाठी किंवा कामे पार पाडण्यासाठी संबद्ध अधिनियमान्वये किंवा त्याच्या प्रयोजनांसाठी नेमलेली, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी

व्यक्ती, आणि त्यात, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ याच्या कलम ३१३ अन्वये किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या परिशिष्ट चार, भाग चार च्या परिच्छेद २२ अन्वये नेमलेल्या प्रशासकाचा अंतर्भाव होतो ;

१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४०.

१९४९ चा मुंबई अधिनियम ५९.

(ब) "नगरपालिका परिषद" म्हणजे महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ अन्वये प्रस्थापित झालेली नगरपालिका परिषद ;

१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४०.

(क) "महानगरपालिका" म्हणजे, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अन्वये प्रस्थापित झालेली महानगरपालिका ;

१८८८ चा मुंबई अधिनियम ३.

१९४९ चा मुंबई अधिनियम ५९.

१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम २.

(ड) महापालिकेच्या संबंधात "संबद्ध अधिनियम" म्हणजे, खंड (ब) मध्ये निर्देश केलेला अधिनियम आणि महानगरपालिकेच्यासंबंधात "संबद्ध अधिनियम" म्हणजे, वरील खंड (क) मध्ये निर्देश केलेला अधिनियम ;

(ई) या अधिनियमात वापरलेले परंतु येथे व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना कोणत्याही नगरपालिकेच्या किंवा महानगरपालिकेच्यासंबंधात, संबद्ध अधिनियमात जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल.

निवडणुका लांबणीवर टाकणे व पालिका-सदस्यांचा पदावधी वाढविणे, इत्यादी.

३. (१) संबद्ध अधिनियमामध्ये किंवा त्याखाली केलेल्या नियमांमध्ये किंवा कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयामध्ये, हुकूमनाम्यामध्ये किंवा आदेशामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) या अधिनियमाच्या प्रारंभापासून ३१ मे १९७८ या तारखेसह, त्या तारखेपर्यंतच्या किंवा राज्य शासन कलम १, पोट-कलम (३) अन्वये अधिसूचित करील अशा अगोदरच्या तारखेपर्यंतच्या कालावधीमध्ये (या अधिनियमात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त कालावधी" असा केला आहे) कोणत्याही नगरपालिका परिषदेच्या सदस्यांची किंवा अध्यक्षाची कोणतीही सार्वत्रिक निवडणूक आणि अशा कोणत्याही पालिका-सदस्याचे किंवा अध्यक्षाचे कोणतेही नैमित्तिक रिकामे पद भरण्यासाठी कोणतीही निवडणूक घेण्यात येणार नाही ;

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त तारीख" असा केला आहे) लगतपूर्वीच्या दिवशी जे पदावर होते असे नगरपालिका परिषदांचे सर्व सदस्य आणि अध्यक्ष (मग ते निवडलेले, नामनिर्देशित, नियुक्त, स्वीकृत किंवा पदसिद्ध असोत) आणि महानगरपालिकांचे सर्व सदस्य (मग ते निवडलेले किंवा नामनिर्देशित असोत) यांचा पदावधी (वाढविलेल्या पदावधीसह) (मग त्यांचा पदावधी उक्त कालावधीमध्ये कोणत्याही वेळी उक्त तारखेपूर्वी समाप्त झालेला असो किंवा उक्त तारखेस किंवा त्यानंतर समाप्त होणार असो), वाढविण्यात आला असल्याचे किंवा यथास्थिती, वाढवावयाचा असल्याचे मानण्यात येईल आणि असा प्रत्येक पालिका-सदस्य व अध्यक्ष उक्त कालावधीमध्ये पद धारण करण्याचे चालू ठेवील ;

(क) उक्त तारखेस जो/जे पदावर होता/होते अशा, कोणत्याही नगरपालिका परिषदेच्या किंवा महानगरपालिकेच्या प्रशासकाचा/प्रशासकांचा पदावधी (वाढविलेल्या पदावधीसह) (मग त्यांचा पदावधी उक्त कालावधीमध्ये कोणत्याही वेळी उक्त तारखेपूर्वी समाप्त झालेला असो किंवा उक्त तारखेस किंवा त्यानंतर समाप्त होणार असो) वाढविण्यात आला असल्याचे किंवा यथास्थिती वाढवावयाचा असल्याचे मानण्यात येईल आणि असा प्रत्येक प्रशासक (त्याच्या जागेवर प्रशासक म्हणून वेळोवेळी नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीसह) उक्त कालावधीमध्ये पद धारण करील किंवा धारण करण्याचे चालू ठेवील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नगरपालिका परिषदांचे सदस्य, अध्यक्ष व प्रशासक आणि महानगरपालिकांचे सदस्य व प्रशासक यांचा, या अधिनियमाद्वारे वाढविण्यात आलेला पदावधी समाप्त झाल्यानंतर ते, नव्याने रचना करण्यात आलेल्या किंवा पुनर्रचित नगरपालिका परिषदेच्या किंवा यथास्थिती महानगरपालिकेच्या गणपूर्ती झालेल्या पहिल्या सभेच्या लगतनंतरच्या दिवसापर्यंत पद धारण करण्याचे चालू ठेवतील.

पालिका-सदस्य व परिषद यांना नामनिर्देशित करण्याची शक्ती.

४. (१) निकटपूर्ववर्ती कलमामध्ये किंवा संबद्ध अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सदस्य व एखादी नगरपालिका परिषद किंवा महानगरपालिका, गणपूर्तीच्या अभावी, संबद्ध अधिनियम किंवा त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही विधी याद्वारे किंवा तदन्वये तिच्यावर सोपविण्यात किंवा लादण्यात आलेली कामे पार पाडण्यास असमर्थ आहे असे राज्य शासनाचे मत असल्यास, राज्य शासनास शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, त्यास आवश्यक वाटेल इतक्या, यथोचित रीत्या अर्हताप्राप्त व्यक्तींना, त्यास आवश्यक वाटेल अशा, उक्त कालावधीपेक्षा अधिक नसणाऱ्या कालावधीसाठी अशा नगरपालिका परिषदेचे किंवा महानगरपालिकेचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करता येईल.

(२) निकटपूर्ववर्ती कलमामध्ये किंवा संबद्ध अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही कारणामुळे नगरपालिकेच्या अध्यक्षाचे पद रिक्त असेल तर, राज्य शासन, शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून रीतसर अर्हताप्राप्त व्यक्तीला उक्त कालावधीतील त्या नगरपालिकेचा अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित करून ते रिक्त पद भरील.

ज्यांचा पदावधी वाढविण्यात आला असेल असे पालिका-सदस्य इत्यादींच्या शक्ती आणि विवक्षित कृतीचे वैधकरण.

५. ज्यांचा पदावधी कलम ३ अन्वये वाढविण्यात आला असेल किंवा यथास्थिती वाढविण्यात आला असल्याचे मानण्यात आले असेल असे नगरपालिकांचे सर्व पालिका-सदस्य, अध्यक्ष आणि प्रशासक आणि महानगरपालिकांचे सर्व पालिका-सदस्य व प्रशासक, वाढविण्यात आलेल्या संपूर्ण कालावधीतसुद्धा (मग तो या अधिनियमाच्या प्रारंभाच्या पूर्वीचा असो किंवा नंतरचा असो) असे पालिका-सदस्य, अध्यक्ष किंवा यथास्थिती प्रशासक म्हणून सर्व शक्तींचा वापर करण्यास, सर्व कर्तव्यांचे पालन करण्यास व सर्व कामे पार पाडण्यास सक्षम असल्याचे मानण्यात येईल व सक्षम असतील ; आणि उपरोक्त कालावधीमध्ये त्यांच्यापैकी कोणीही केलेली कोणतीही कृती, पदावधी योग्य वेळी वाढविण्यात आला नव्हता किंवा अन्यथा योग्य रीतीने वाढविण्यात आला नव्हता किंवा त्या वाढविण्यात आलेल्या कालावधीत नगरपालिकेला, महानगरपालिकेला, पालिका-सदस्याला, अध्यक्षाला किंवा प्रशासकाला नगरपालिकेच्या, महानगरपालिकेच्या, पालिका-सदस्याच्या, अध्यक्षाच्या किंवा यथास्थिती प्रशासकाच्या सर्व किंवा कोणत्याही शक्तींचा वापर करता येत नव्हता, सर्व किंवा कोणत्याही कर्तव्यांचे पालन करता येत नव्हते किंवा सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडता येत नव्हती, याच केवळ कारणावरून अवैध असणार नाही किंवा त्या कृतीस कोणत्याही न्यायालयात आव्हान देण्यात येणार नाही.

**विद्यमान पालिका-सदस्य आणि प्रशासक यांच्या वाढवलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर नवीन महानगरपालिका आणि नगरपालिका परिषद यांची रचना करण्यासाठी करावयाची व्यवस्था.**

६. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, शासकीय राजपत्रात राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या (उक्त कालावधीच्या समाप्तीपूर्वीची असलेली तारीख) तारखेनंतर, या अधिनियमाद्वारे वाढवलेला, विद्यमान पालिका-सदस्य, अध्यक्ष आणि प्रशासक यांचा पदावधी संपण्यापूर्वी किंवा त्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, संबद्ध अधिनियमाच्या आणि त्याखालील नियमांच्या उपबंधांनुसार, नवीन महानगरपालिका किंवा यथास्थिती, नगरपालिका परिषद यांची रचना किंवा पुनर्रचना करण्यासाठी, जिल्हाधिकाऱ्यांकडून आणि इतर संबंधित शासकीय व नगरपालिका अधिकाऱ्यांकडून व्यवस्था करण्यात येईल.

**संबद्ध अधिनियम लागू होणे.**

७. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये उपबंधित केले असेल ते खरीज करून, संबद्ध अधिनियमाचे उपबंध, संबंधित नगरपालिका परिषद किंवा महानगरपालिका यांच्यासंबंधात इतर सर्व बाबतीत लागू होतील.

**अडचणी दूर करणे.**

८. या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणताना किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत संबद्ध अधिनियम अंमलात आणताना, कोणत्याही अडचणी आल्यास, प्रसंग उद्भवेल त्यानुसार, राज्य शासनास, आदेशाद्वारे, अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल.

(यथार्थ अनुवाद)

**य. शं. कानिटकर,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.